फुलपाखरू

लेखन व चित्रांकन: पैट्रीशिया पोलाको

मराठी: अश्विनी बर्वे




फ्रान्समध्ये बसलेले मोनीकच्या छोट्याशा गावात जेव्हा आपले लांब बूट घालून नाझी सैनिक घुसले आणि तिथल्या रहिवाशीना त्रास देऊ लागले, मोनीकला त्याचे आश्चर्य वाटले नाही. कारण तो काळच युद्धाचा होता. त्याचवेळी एका रात्री मोनीकने आपल्या अंथरुणाजवळ ‘एक लहान भूत’ बघितले.

पण नंतर समजते की ते काही भूत-बित नाही. ती एक छोटी यहुदी मुलगी सेवरीन आहे. ती नाझीपासून वाचण्यासाठी इथे मोनीकच्या घराच्या तळघरात लपून राहिली. याचे मात्र मोनीकला आश्चर्य वाटले. रात्रीच्या अंधारात मोनीकच्या घरात एकमेकांशी खेळत या दोन लहान मुलांची मैत्री होते. पण नंतर तो भीतीदायक क्षण सुद्धा येतो. जेव्हा त्यांना रात्रीच्या अंधारात एकमेकांपासून वेगळे व्हावे लागते आणि सेवरीनच्या परिवाराला जीव वाचवण्यासाठी परत पळावे लागते.

पैट्रीशिया पोलाको फ्रान्सिसने जेव्हा आपल्या परिवाराच्या इतिहासात डोकावून बघितले तेव्हा तिच्या समोर हृदय भरून टाकणारी भावपूर्ण खऱ्या मैत्रीची कहाणी आली.



फुलपाखरू



माझी मावशी आजी (आजीची बहीण) मार्सेल सोलिलियाज आणि त्यांची मुलगी म्हणजे माझी मावशी मोनीक बोसू गो यांच्यासाठी. या दोन धाडसी महिला! यांच्यावर मी जन्मभर प्रेम करत राहिन.





फुलपाखरू



पॅरिसच्या बाहेर वसलेल्या चैसी-ल रुआ गावात, मोनीकच्या झोपण्याच्या खोलीतल्या खिडकीच्या बाहेर चांदणे पसरले होते चंद्र तर असा चमकत होता जसे की एखादा उत्सव आहे. मोनीक चंद्राकडे बघत विचार करू लागली की कदाचित चंद्राला माहीतच नसेल की तिच्या गावावर नाझी सैनिकांनी कब्जा केला आहे. तिचे गावच नाही तर पूर्ण फ्रान्सवरही. आणि मोनिकला वाटले की सगळ्या जगात एक भयानक युद्ध छेडले आहे.

पण त्यारात्री वाटत होते की चंद्राला कसलीच पर्वा नाही. मोनीकने आपल्या मांजराला जवळ ओढले. तिला छातीजवळ घेऊन शुभरात्र म्हटले आणि ती झोपी गेली.

मोनीकला कळले नाही की ती कशी जागी झाली. पण डोळे उघडताच तिने आपल्या अंथरुणावर खिडकीजवळ एका भूतिनीची आकृती बघितली. ती तिच्या वयाचीच मुलगी होती, जी पिनुअफ़ला झोपवत होती.

“तू कोण आहेस?” मोनीक कुजबुजत म्हणाली.

ती भुताची मुलगी तिच्याकडे वळाली, तिचे उदास डोळे घाबरलेले वाटत होते. ती पटकन उठली आणि मोनीकच्या खोली बाहेर पळाली.







दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्त्याच्या वेळी मोनीक आपल्या आईला भुताच्या बाबत सांगण्यास उत्सुक होती. पण आईतर स्तब्ध झाली. तशी तर मार्सेल सोलिलियाज कधी कोणावर नाराज होत नसे. “अरे, ते स्वप्नं होते. ऐकलं का ते एक स्वप्नं होते. आता चल शाळेत जा. देवाला माहीत किती दिवस शाळेत जाण्याची संधी मिळेल. या युद्धामुळे.” आईचा आवाज शेवटी गंभीर झाला.

मोनीक शाळेत गेली आणि तिच्या जवळच्या मैत्रिणीला डेनीसला खरं सांगण्यासाठी उत्सुक होती. कारण मोनीक अशी एकमेव मुलगी होती जिला डेनीस बहिणी सारखी वाटत होती.

त्या दुपारी शाळेतून परत येतांना डेनीसने मोनीकला विचारले, “ती भूत मुलगी कशी वाटत होती?”

“तिचा रंग सावळा होता आणि डोळे खूप उदास..“ मोनीकने उत्तर दिले.

“तुला भीती वाटली नाही का? “ डेनीसला जाणून घ्यायचे होते.

“हो - पहिले पहिले वाटली होती. पण तिला बघताच मनात एक वेगळाच विचार आला. मला तिची नाही तर तिच्यासाठी भीती वाटू लागली.मोनीक म्हणाली.




दोघी मैत्रिणी मोस्यू मार्कच्या गोड गोळ्यांच्या दुकानासमोर थांबल्या आणि आत डोकावू लागल्या. मोस्यू मार्कने नेहमीसारखा हात हलवला. त्यांचे गल्लीतल्या मुलांवर प्रेम होते. त्यांच्या ॲप्रनच्या खिशात रंग-बिरंगी कागदात असणाऱ्या गोड गोळ्या ठेवल्या होत्या.

जेव्हा मुली आत घुसल्या. त्यांनी बघितले गोळ्या आणि चॉकलेटच्या बहुतेक बरण्या रिकाम्या होत्या.

पण मोस्यू मार्कने त्यांच्यासाठी काहीतरी बाजूला काढून ठेवलं होतं. “तुझ्यासाठी छोटीशी मोनीक,” मोस्यूने मोनीकच्या हातावर चटकदार कागदात असलेली गोळी ठेवली. “आणि एक तुझ्यासाठी गोड छोटी,” आणि सुंदर कागदात असलेली गोळी डेनीसच्या आतुर हातात ठेवली.

मोनीक आणि डेनीसने आपापल्या गोळ्याचे कागद काढले आणि लगेच तोंडात टाकल्या. पण जेव्हा त्या दुकानातून निघाल्या एव्हा त्यांना अचानक डोंगरावरून येतांना लांब बूट दिसले.







लांब चमचमणारे बूट घालून येणारी पाऊले नाझी सैनिकांची होती. जेव्हा त्याच्या बुटांच्या टाचा रस्त्यावर पडत तेव्हा वाटे की बंदुकीतील गोळ्यांचा आवाज येत आहे. लोक त्यांना बघून भीतीने एकाचा जागी थांबत. त्यांच्या पासून डोळे फिरवून घेत. दोन्ही मुलीना सुद्धा पळून जावेसे वाटत होते. पण त्या समजदार होत्या. त्या पर्वा नसल्यासारखे बोलायला आणि हसायला शिकल्या होत्या.


"ते आमच्याकडे बघत आहेत का?" मोनीकने थोडे दूर जाऊन श्वास घेत विचारले.

डेनीसने मागे वळून बघितले. "नाही ते पुढे जात आहेत."

तेव्हा त्यांना ओरडण्याचा आणि काच तुटण्याचा आवाज आला. दोघींनी मागे वळून बघितले. त्या हे बघून दुःखी झाल्या की नाझी सैनिकांनी मोस्यू मार्कला त्याच्या दुकानातून बाहेर फरफटत आणले.

"श्वाइन (डुक्कर)...यूडन श्वाइन (यहूदी डुक्कर)!" सैनिक मोस्यू मार्कला जमिनीवर ढकलत शिव्या देत होते. त्यांनी आपल्या जड बुटांनी मोस्यू मार्कच्या पोटात लाथा मारल्या. मोनीकने आपला आवाज दाबण्यासाठी तोंडावर हात ठेवला. तोपर्यंत एक गाडी आली आणि नाझींनी मोस्यू मार्कला त्यात घातले.

"जास्त वेळ बघत बसू नको मोनीक!" डेनीसने सुचवले. "असे केले तर पुढच्या वेळी ते आपल्यासाठी येतील."



जेव्हा दोन्ही मुली रु द बोनार वरून पळत मोनीकच्या घरी पोहचल्या. त्या स्फुंदून स्फुंदून रडत होत्या. त्यांना माहीत होते की नाझींच्या काळत अशा घटना होत असत. पण त्यांनी ते आपल्या डोळ्यांनी बघितले नव्हते. आणि ते ही मोस्यू मार्क बरोबर !

“का....का पण आई, त्यांनी मोस्यू मार्कबरोबर असे का केले? मोनीकने स्फुंदत विचारले.

“नाझी मोस्यू मार्क सारख्या लोकांची घृणा करतात बाळा! गोष्ट अर्थहीन आणि क्रूर आहे, पण तिचा आवाज बदलला.

“मोस्यू मार्क सारखे लोक म्हणजे काय आई,” मोनीकला समजून घ्यायचे होते.

“तुला तर माहीत आहे मोनीक,” आईने उत्तर दिले “यहूदी लोकांसारखे ।”

“पण मोस्यू मार्कतर फ्रेंच आहेत ना?” डेनीसने विचारले.

मार्सेलने दोघांना जवळ घेतले. “नाझी कायमस्वरूपी राहणार नाहीत, बाळांनो, पण फ्रेंच माता इथे अनेक शतकांपासून आहे. आणि नाझी एका छोट्या काळासाठी घाबरवण्यासाठी. मार्सेलचे डोळे पाण्याने भरले.

“मी तुम्हांला शांत करण्यासाठी चहा करते. मोस्यू मार्कला तुम्ही काळजी करत दुःखी व्हावे असे वाटणार नाही.”

“मॅडम!” समोरच्या दारातून कोणीतरी आवाज आला. ते पैर वोलिआर्ड होते, सेंट जर्मन द प्रेचे पाद्री. ते अडखळत आत घुसले. “तुम्ही ऐकले का मोस्यू मार्कच्या बरोबर काय झाले?”

मार्सेल त्यांना बैठकीत घेऊन आले आणि दरवाजा बंद केला. मोनीकची आई अनेक वेळा लोकांना हळूहळू बोलतांना बघितले होते. खासकरून युद्ध सुरु झाल्यावर .



अनेक रात्री गेल्या, पण मोनीकला ते लहान भूत नज़रेस पडले नाही. पण तेव्हा एका रात्री मोनीक दचकून जागी झाली. तिने खिडकीजवळ बसलेले ते लहान भूत बसलेले पाहिले. यावेळी ती पिनुअफला घेऊन बसलेली होती. ते स्वप्नं नव्हते, कारण मोनीक पिनुअफला गुरगुरतांना ऐकत होती.

"मी तुला बघते आहे," मोनीक कुजबुजली.

ती लहानगी उठून उभी राहिली. पण यावेळी मोनीकने तिला पळण्यापासून थांबू शकली.

"घाबरू नको, तुला इथे काही त्रास होणार नाही."

उदास डोळ्यांची ती लहानगी परत बसली, पण काही बोलली नाही.

"तुझे नाव काय आहे? तू कुठून आलीस?" मोनीकने आतुरतेने विचारले.

मुलगी खूप वेळ पिनुअफला घट्ट चिटकून बसली. "खूप आधी माझ्याकडे अशीच एक मांजर होते," शेवटी ती म्हणाली.

"हिचे नाव पिनुअफ आहे, आणि तुझे नाव काय आहे?" मोनीक तिच्याजवळ येऊन बसली.

"माझे नाव सेवरीन...सेवरीन आहे," ती हळू आवाजात म्हणाली.

"तू कुठे राहतेस?" मोनीकने पण हळू विचारले.

"युद्ध सुरु झाल्यापासून मी अनेक ठिकाणी राहिली आहे," सेवरीनने उत्तर दिले.

"पण आता कुठे राहते? आणि तुझे आई-बाबा? तुला त्यांची आठवण येत असेल ना? खासकरून अशा रात्री."

मुलीने काहीच उत्तर दिले नाही.

"कुठे राहते तू?" मोनीकने ज़ोर देऊन विचारले.

"इथेच!" सेवरीन शेवटी बोलली.

"इथे?" मोनीकने आश्चर्याने एवढ्या जोरात विचारले की सगळी गल्ली जागी झाली असती. "पण इथे तर मी राहते."





सेवरीनने इशारा करून मोनीकला आपल्या मागे यायला सांगितले. दोघी दबक्या पावलांनी बैठकीच्या खोलीत आल्या. तिथे मोनिकला फरशीवर लावलेले चोर दरवाज्याजवळ असलेली दरी दिसली.

सेवरीनने दरवाज़ा उघडला आणि दोघी जिन्याने तळघरातल्या त्या भागात आल्या जो मोनीकला माहीत नव्हते. त्याच्या भिंती खरडून साफ केलेल्या होत्या. तिथे एक मोठे टेबल होते ज्यावर खाण्याचे पदार्थ एका ट्रे मध्ये ठेवलेले होते. मोनीकला अजून एक छोटी खोली दिसली जिथे एक पलंग ठेवलेला होता. असे वाटले की तिथे लोक झोपत असतील.

"माझे आई-वडील आणि मी अनेक दिवसांपासून इथे राहत आहोत," सेवरीनने रडत सांगितले. "नाझी आमचा शोध घेत आहेत, तुला माहीत आहे ना? आम्ही यहुदी आहोत. आम्ही लोक सबंध फ्रान्स मध्ये लपलेले आहोत."

"पण तुम्ही लोक माझ्या आईला न सांगता इथे कसे राहू शकतात?"

"ओह! मॅडम सोलिलियाज? त्यांना माहीत आहे. आणि आम्ही एकटे नाही ज्यांना त्यांनी मदत केली आहे."

हे सगळे तिच्या घरात कसे होत होते? आईने याबाबत कधीच कोणाला कसे सांगितले नाही?

"तुझ्या आईने माझ्याकडून वचन घेतले होते की तुझ्या खोलीत तू असतांना येणार नाही."

"मला कळले नाही," मोनीक गोंधळली होती.

"माझ्याबद्दल तुला माहीत झाले तर तू धोक्यात येऊ शकते. ती तुला वाचवत होती."

मोनीक अजून काही सांगणार होती तेव्हाच तिला वरच्या मजल्यावर पायांचा आवाज ऐकू आला.मार्सेलने त्यांचे बोलणे ऐकले होते का?

"लवकर कर मोनीक!" सेवरीनने तिला जिन्यावर ढकलत म्हटले.

"पण आता तुला मी कधी भेटू?" मोनीकने दरवाज़ा बंद करण्याच्या वेळी आपल्या नवीन मैत्रिणीला विचारले.





दुसऱ्या दिवशी सकाळी नाष्ट्याच्या वेळी मोनिकला सुचतच नव्हते की आईशी काय बोलावे? ती तिला रहस्यमय वाटत होती. पण ती नेहमीसारखी मोनिकला सांगत होती. “बाळा बागेत जा आणि टेबल सजवण्यासाठी काही सुंदर फुले तोडून आण.”

मोनीक उड्या मारत स्वयंपाक घराच्या दरवाज्यातून बागेत गेली, पिनुअफ तिच्या मागे गेली.

पिनुअफ फुलांच्या पानांशी खेळत होती. मोनीकने काही फुले तोडली आणि परडीत ठेवली. अचानक पिनुअफ घासवर पसरली. तिचे डोळे विस्फारले. मोनीकला लवकरच कळले ती असे का करते आहे ते? एक फुलपाखरू एका फुलावरून दुसऱ्या फुलावर फिरत होते. जेव्हा ते भिंतीजवळच्या निळ्या गोकर्णच्या फुलावर जाऊन बसले., मोनीकने पिनुअफला उचलून घेतले.

‘‘नाही, त्याला घाबरवायचं नाही, फक्त बघ! किती सुंदर आहे हे फुल हो ना? दोघीजणी गुपचूप फुलपाखराला बघत राहिल्या.

पण अचानक हवा थांबली आणि गरम होत होते. आतापर्यंत पक्षी किलबिल करत होते ते ही शांत झाले. पिनुअफने स्वतःला मोनीकच्या ॲप्रनमध्ये लपवले. मोनीकने भिंतीच्या पलीकडे चमचमणारे बूट बघितले. तिच्या ह्दयात धडधड होऊ लागली. तीन नाझी त्यांच्या घराकडे बघत होते. त्यातला एकाने डोकावून बघितले. आणि कातड्याचे मोजे घातलेल्या हाताने त्याने फुलपाखरू पकडले. “सुंदर आहे ना?” तो मोनीककडे बघून हसला आणि मुठ दाबली. बाकी लांब बूटवाले हसले. ते काहीतरी बडबडत हसले आणि पुढे गेले.



“आई, आई! लांब बूटवाले,” मोनीक ओरडत घराकडे पळाली. तिने आईला सगळं काही सांगितलं जे तिथे घडले होते.

“अरे देवा! ते राक्षस आहेत,” आई रागाने म्हणाली. आणि तिने आपल्या मुलीला घाईने जवळ घेतले.

“आई,” मोनीक स्फुंदत म्हणाली! “ते मोस्यू मार्कबरोबर तसेच वागले असतील का? जसे त्यांनी फुलपाखरा बरोबर आज केले. आईने काहीच उत्तर दिले नाही. ती मोनीकला फक्त हळूहळू थोपटत राहिली. तिचे डोळे बाहेर शून्याकडे बघत राहिले.

पण मोनीकला उत्तर मिळाले होते.. आता तिला सेवरीनच्या डोळ्यात दिसणारी वेदना समजली. आपल्या मित्रांच्या आणि शेजारांच्या डोळ्यात दिसणारी भीती समजली, जी भीती नाझींच्या जवळ येण्याने ते अस्वस्थ होत होते. तिला समजले की तिच्या नवीन मैत्रिणीला सुरक्षित ठेवायचे आहे. कोणत्याही परिस्थितीत ते गुपित उघड व्हायला नको की सेवरीन त्यांच्या तळघरात राहते.





यानंतर सेवरीन जेव्हा तेव्हा मोनीकच्या खोलीत येत असे त्यासाठी तिला आपल्या आईवडिलांना किंवा मोनीकच्या आईला जागं करावं लागत नसे. ती गुपचूप येऊ शकत असे. मार्सेलला याची माहिती व्हायला नको हे तिला समजत होते. जेव्हा दोन्ही मुली बरोबर असत, त्या वेगवेगळे कपडे घालून सोंग घेत असत. मध्य रात्री त्या चहाची पार्टी करत असत. त्या हसत, खो खो हसत,आणि एकमेकींना आपल्या स्वप्नांबद्दल सांगत.

मोनीक बाहेरच्या जगातील सर्व गोष्टी एकत्र करत ज्याने सेवरीन त्या बघाव्यात, त्यांना स्पर्श करावा आणि त्याचा अनुभव घ्यावा.

“आज तू माझ्यासाठी काय आणले?” सेवरीनने एका रात्री हळूच विचारले.

मोनीकने एका कापडी पिशवीत हात घातला आणि एक सेवरीनच्या हातावर थोडीशी उपजाऊ काळी माती ठेवली. “या मातीत बाहेरच्या हवेचा सुगंध आहे,” मोनीकने म्हटले. नंतर तिने सेवरीनला आपल्या बागेतले एक फुल दिले. “हे तुझ्यासाठी सूर्याच्या प्रकाशाचे काम करेल आणि आता तू तुझे डोळे बंद.कर.” मोनीकने आपली ओंजळ हळूच उघडली “बघ तर ज़रा!” ओंजळीत एक खूप सुंदर फुलपाखरू होते.

“अरे! फुलपाखरु !” सेवरीन आश्चर्याने म्हणाली.

मोनीकने फुलपाखरू सेवरीनच्या गालावर ठेवले. “त्याला आपले पंख फडफडू दे,” मोनीक म्हणाली.

सेवरीनने आपला श्वास रोखला आणि हसली.

“परीचा मुका घेतल्यासारखे वाटते.. हो ना? मोनीकने म्हटले.





सेवरीनच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले. “मला माझ्या घराची आठवण येते मोनीक. माझ्या स्वतःच्या अंथरुणाची, माझ्या मांजराची, माझ्या बागेची.”

“नाझी नेहमी इथे राहणार नाही सेवरीन. आई म्हणते की ते नक्कीच युद्धात हारतील,” मोनीक धैर्य गोळा करत म्हणाली.

“आम्ही आमच्या घरात शबाथ साजरा करत असू. इतर सण देखील, पासओवर, हानुका... माझी आई त्या त्या दिवशी पक्वान्न तयार करत असे. पूर्ण कुटुंब दूरदुरून एकत्र जमा होत. पण आता सगळं काही बदलले आहे. आम्हांला पळावे लागले. आई-बाबा घाबरले की नाझी आम्हांला मारून टाकतील.”

“एक दिवस तुम्ही नक्कीच घरी जाल,बघ.”

“बाबा नरम हवेत श्वास घेत घेत आजारी पडले. त्यांनी अनेक महिन्यांपासून ऊन बघितले नाही. रात्री आईला त्यांचे तोंड उशीने झाकावे लागते. म्हणजे त्यांच्या घोरण्याचा आवाज वर ऐकू येणार नाही.

“मी वचन देते, सेवरीन, एक ना एक दिवस तू मुक्त होशील..या फुलपाखरासारखी.”

“आता याला उडून जाऊ दे मोनीक,” सेवरीन म्हणाली. “ते उडेल तेव्हा मला वाटेल की मी,माझे आई वडील स्वतंत्र होऊन उडत आहोत.”

मुली फुलपाखराला झोपण्याच्या खोलीतल्या खिडकीत घेऊन गेल्या आणि त्याला रात्रीच्या हवेत सोडून दिले. तेव्हा दोघीजणी खिडकीजवळ उभे राहून ते नजरेआड होईपर्यंत बघत राहिल्या.




अचानक त्यांनी वर बघितले - का माहीत नाही. त्यांना समोरच्या घरातल्यांचे शेजारी मोस्यू लैनडोरमी दिसले. ते आपल्या खिडकीतून त्यांच्याचकडे सरळ बघत होते.

मोनीकचे हृदय धडधडत होते. त्यांना दिसू नये म्हणून सेवरीन लगेच खिडकीच्या खाली लपली. दोघींनी घाबरून एकमेकींकडे बघितले. आता त्यांच्या लक्षात आले की आता मार्सेलला सगळं सांगावं लागेल.

त्या मार्सेलच्या खोलीकडे धावल्या. तिला त्यांनी उठवलं. त्या दोघींना एकत्र बघून तिला आश्चर्य वाटले. जेव्हा त्यांनी आपली ओळख आणि मोस्यू लैनडोरमीच्या बाबत सांगितले. मार्सेल त्यांच्यासमोर गुडघ्यांवर बसली. “हे देवा, भगवंत!” ती दुःखाने घाबरून म्हणाली.

‘‘तुम्ही नाराज़ आहात, मॅडम सोलिलियाज?’’ सेवरीनने विचारले आणि ती रडू लागली.





“अग नाही, माझ्या बाळा. बिलकुल नाही. मी नाराज नाही. तू तर छोटीशी मुलगी आहे. ना तू हे युद्ध सुरु केले ना या तळघरात राहण्याची निवड केली. तुला खेळण्याची गरज होती – मुलांना खेळण्यासाठी दुसरे मुल हवे असते, बाळा.” मार्सेलने तिचे केस नीट केले. “पण आता तू इथे सुरक्षित नाहीस, माझ्या बाळा.”

“आपल्याला आज रात्रीच घर सोडावे लागेल,” मार्सेल आपले कपडे बदलत म्हणाली.

“आम्हांला, तुला आणि तुझ्या परिवाराला देशाच्या बाहेर निघावे लागेल. बघू या काय व्यवस्था होऊ शकते. पैर वोलियार्ड तुझ्या आईवडिलांना पुढचा आश्रय मिळेपर्यंत घेऊन जाऊ शकेल. तू माझ्या आणि मोनीकबरोबर प्रवास करशील. ऐका मुलींनो तुम्ही जितके कपडे घालू शकतात तेवढे घाला. कपड्यांवर कपडे. घाला. आपण पेटी, पिशव्या नेऊ शकत नाही. नाहीतर लोकांचे लक्ष आपल्याकडे जाईल.”





मुलींनी मार्सेल, पैर वोलिआर्ड आणि सेवरीनच्या आईवडिलांना तळघरात जमिनीवर खड्डा खोद्तांना बघितले. त्यांनी तिथे ते सगळं दफन केले ज्यावरून कोणाला वाटेल की तिथे कोणी राहत होते. निघण्याची वेळ झाली होती. सेवरीनचे आई आणि वडील ख्रिश्चन नन आणि पाद्रीच्या वेषात निघाले. सेवरीनला त्यांनी जवळ घेतले, निघतांना ते दोघे रडत होते. ते सेवरीनला दक्षिण फ्रान्समधल्या पुढच्या गावात भेटतील असे ठरवले गेले. जे स्वित्ज़रलैण्डच्या सीमेवर वसलेले होते.

“आज रात्री देव आपल्याबरोबर राहील!” पैर वोलिआर्डने प्रार्थना केली.

“परवरदिगार आपला मालक आहे,” सेवरीनचे वडिलांनी रडत प्रार्थना केली. “देव आपल्याबरोबर आहे.”




मोनीक, सेवरीन आणि मार्सेलला वाटत होते की त्या अंधारात मैलोंमैल चालत आहेत. त्या मागच्या छोट्या गल्लामधून चालू लागल्या. रस्त्यावरील चमकणारे दिवे टाळत त्या सावध होत कोणाला त्यांची चाहूल लागू नये याची काळजी घेत चालत होत्या.

दिवस उगवण्याच्या आधी त्या ग्रामीण भागात होत्या. त्या झाडाखाली दम घेण्यासाठी थांबल्या. त्या त्या जागेच्या जवळ होत्या जिथून दुसरे लोक सेवरीनच्या आईवडिलांजवळ जाणार होते.

मार्सेलने दोघींना खाण्यासाठी पाव आणि पनीर देतच होती तेवढ्यात तिने दोघींना जवळच्या खड्ड्यात घसटले. खुणेने दोघींना गप्प बसायला सांगितले. नाझी सैनिकांची गस्त घालणारी गाडी रस्त्यावरून सावकाश जात होती.

गाड़ी निघून गेल्यावरही त्या तिघी काहीवेळ पर्यंत गप्पच बसून राहिल्या.




शेवटी एक दूसरी गाड़ी आली, ती पण रस्त्यावरून हळूहळू जात होती. पुलापासून जवळ शंभर फुटावर दूर ती थांबली. तिचे दिवे तीन वेळा लागले आणि विझवले गेले.

''वेळ आली आहे माझ्या लाडक्या बाळांनो," मार्सेलने सेवरीनला खड्ड्यातून बाहेर काढले. "हे लोक तुला आणि तुझ्या आईवडिलांना मदत करतील."

मोनीकने गाड़ीच्या जवळ आपल्या झोळीतून बाहेर काढले, जे ती रस्त्याभर वाहून आणले होते. ती तिची लाडकी पिनुअफ होती! ''हिला घेऊन जा सेवरीन,'' मोनीक स्फुंदत म्हणाली.

सेवरीनचे डोळे भरून आले. तिने पिनुअफला आपल्या स्वेटरमध्ये ठेवले. मग आपल्या खिशात हात घातला आणि एक सुंदर नाज़ूक सोन्याची चेन काढली ज्यावर स्टार ऑफ डेविड (यहूदी आस्थाचे प्रतीक) लटकत होते. "मला विसरू नकोस मोनीक।''





“आपण जवळजवळ घरी पोहचलो,बाळा,” मार्सेलने मेलनच्या रेल्वे स्टेशनवर पोहचल्यावर म्हटले. त्यांनी इथूनच आपल्या गावासाठी चैसी-ल रुआसाठी ट्रेन पकडायची होती.

सकाळची वेळ होती तरीही फिरणाऱ्याची खूप गर्दी होती. स्टेशन ठासून भरलेले होते. नाझी सैनिक सगळ्यांना थांबून तपासणी करत होते, लोकांवर हुकुम गाजवत होते. मार्सेलने मुलीचा हात घट्ट पकडला.मोनीकच्या दुसऱ्या हातात सेवरीनची चेन पकडलेली होती.

मोनीक आणि मार्सेल त्या फाटकाजवळ आल्या जिथे कागदांची तपासणी होत होती. मार्सेलने आपल्या बटव्यातून तिकीट आणि कागद काढले. ट्रेन पकडण्यासाठी सर्व लोकांना त्या दुसऱ्या फाटकातून आत यावे लागत असे.

मोनीक आणि मार्सेलच्या मागे अचानक गर्दी धक्के देत वाढू लागली. धक्का एवढा जोरात होता की मोनीकचा हात सुटला. आता तिला आपली आई दिसत नव्हती. लोक धक्का-मुक्की, ओढा ओढी करत होते. मोनीकचा पाय सरकला आणि ती खाली पडली. तिच्या पकडीतून सेवरीनची चेन प्लैटफॉर्म वर पडली.

तिने झपाट्याने चेन उचलली आणि आपल्या खिशात ठेवली. ती उभी राहिली आणि त्या रांगेत जाऊन थांबली जिथे धक्के देणारे लोक रेल्वे डब्यात घुसत होते.


लांब बूटवाले धाक दाखवत होते. जर त्यांनी तिची तपासणी केली असती आणि सेवरीनची चेन ताब्यात घेतली तर? आणि आई, ती कुठे आहे?

मोनीकला आपल्या डब्याच्या खिडकीतून सर्व लोक दिसत होते जे उलट्या दिशेने येणारी ट्रेनची वाट बघत होते. तिची आई धक्क्यांमुळे त्या रांगेत जाऊन उभी राहिली असेल का? आपल्या आसवामधून आईचा चेहरा शोधण्याचा ती प्रयत्न करू लागली. तेव्हा तिला एक एकटी मुलगी दिसली. वाळलेली दुबळी मुलगी दिसली. दुखावलेली ती मुलगी सेवरीन सारखी उदास दिसत होती.

मुलीच्या कोटावर पिवळ्या रंगाचा स्टार ऑफ डेविड चिटकवलेला होता. ती सेवरीन होती का? नाही,आता तिला स्वच्छ दिसले की ती सेवरीन नव्हती.

मोनीकने खिशात ठेवलेली चेन मुठीत घट्ट धरून ठेवली.

“ओह आई, आई तू कुठे आहेस? झटक्यात ट्रेन निघाली आणि मोनीक रडू लागली.





ट्रेन आवाज करत थांबली. स्टेशनच्या पाटी वर सेंट जॉर्ज लिहले होते. चैसी-ल रुआ घरापासून फक्त दोन किलोमीटर दूर होते. मोनीकने तीच मागची गल्ली पकडली जिथून ती काल रात्री सेवरीन आणि आई बरोबर गेली होती. ''ओह आई,'' चालतांना ती रडतच होती.

शेवटी तिला घराचे ओळखीचे फाटक दिसले. ती तो ढकलून आणि पायऱ्या चढून आत आली.हवेत तिच्या आईच्या अत्तराचा सुगंध पसरला होता. ती खूप थकली होती. ती आपल्या अंथरुणावर पडली आणि गाढ झोपली.

तिला स्वप्नात आईचा आवाज ऐकू आला. “अरे माझे लहानसे बाळा,” आवाजाने हाक आली. तेव्हा स्वप्नात एक थंड हात तिच्या कपाळावर हात फिरवला. स्वप्नं इतके वास्तविक तिला वाटले की हे सत्यात घडत आहे.

मग तिने डोळे उघडले आणि बघितले की तो हात खरा होता! आवाज पण खरा होता. समोर आईच होती.

''माझी लाडूबाई! माझी शूर मुलगी,” आई तिला जवळ घेत हलवत म्हणाली. “मला पूर्ण विश्वास होता की तू इथेच भेटशील.”



एक आठवडा गेला,दुसराही गेला.मोनीक कल्पना करत राहिली की सेवरीन, तिचे आई-वडील आणि पिनुअफ सगळे चांगले असतील. तेव्हा तिच्या दरवाज्यासमोरून लांब बूट जात.ते तिला आठवण देत की नाउमेदीची परिस्थिती कायम आहे. जर सेवरीनचा संदेश मिळाला असता, एखादा निरोप. काहीही.

एक दिवस मार्सेल आणि मोनीक बागेत पुढच्या वर्षीसाठी फुलांचे कंद लावत होते. तेव्हा मार्सेलने अचानक जोरात श्वास घेतला.

"बघ मोनीक, बघ बर!" आई आकाशाकडे हात करत होती. एक फुलपाखरू उडत खाली उतरले. मग एक दुसरे, त्यानंतर अजून एक.

दोघी एकटक बघत राहिल्या आणि फुलपाखरे फांद्यावर, फुलांवर येऊन बसले. आधी फक्त तीन होते, मग दहा, वीस आणि तीस.

शेजारी आपल्या घरातून बाहेर निघाले पड़ौसी आणि त्यांच्या कुंपणाच्या भिंतीवरून बघू लागले.

"य हा शुभ संकेत आहे, आई! एक चमत्कार! यांना सेवरीनने पाठवले आहे. मला माहीत आहे. ती आणि तिचे आईवडील सुरक्षित आहेत."

मोनीकने आपला हात उचलला आणि एक फुलपाखरू तिच्या बोटावर येऊन बसले. तिने ते आपल्या गालाजवळ नेले. त्याने पंख फडफडवले. "एक पापा!" मोनीकने हळुवारपणे म्हटले.





लेखिका की टीप

मार्सेल सोलिलियाज फ्रान्सच्या त्या भूमिगत आंदोलनाची भाग होती जे जनरल चाल्र्स द गॉल आणि अनेक निस्वार्थी फ्रेंचांना नाझींच्या विरोधात उभे केले होते. या लोकांनी आपली घरे यहुदीसाठी उघडले जे नाझींपासून स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होते. वास्तविक ते स्वतः त्यांना आणि त्यांच्या परिवाराला धोक्यात टाकत.

माझी मावशी मोनीकच्या म्हणण्यानुसार तिची आई मार्सेल तेव्हापासून भूमिगत विरोधाचा भाग होती. जेव्हापासून नाझींनी फ्रान्सवर ताबा मिळवला होता. पण मोनिकला त्याची अजिबात भनक नव्हती. तोपर्यंत सेवरीनशी तिची भेट झाली नव्हती. आंदोलनाशी असलेल्या त्यांच्या घनिष्ट सबंधाची माहिती मावशीला युद्ध संपल्यावर कळली.

फ्रान्स मुक्त झाल्यावर दोन वर्षाने मोनीक आणि मार्सेलला एक पत्र मिळाले. पाकिटात एक कार्ड होते ज्यावर एक फुलपाखराचे चित्र होते. आत लिहलेले होते- "मी जिवंत आहे. सेवरीन! तिच्या सहीजवळ एका हाताच्या पंजाचे चित्र होते.

नंतर कळले की सेवरीनच्या आईवडिलांनी पळण्याचा प्रयत्न केला पण ते वाचू शकले नाही. पण सेवरीनला स्वित्ज़रलैण्ड पोहचवले गेले आणि तिथून ती इंग्लडला पोहचली. युद्धाच्या काळात ती आपल्या परिवाराच्या मित्रांबरोबर इंग्लडमध्ये राहिली. त्या काळानंतर ती आपल्या नातेवाइकांबरोबर नवीन वसवलेल्या इस्त्रायल मध्ये राहू लागली. मोनीक आणि सेवरीन अजूनही मैत्रीणी आहेत.

युद्ध समाप्त झाल्यावर तीस वर्षों नंतर मार्सेलने स्थानीय यहूदी अजेन्सीशी संपर्क साधला. म्हटले की त्यांनी ते सामान घेऊन जावे, जे त्यांच्या घरातील तळघरात निवारा घेतलेल्या लोकांचे होते. आणि आजपर्यंत ते तिथेच आहे. ते घ्यायला कोणीही आजपर्यंत आले नाही.